**राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र**

क्र.रानिआ-२०२५/ईव्हीएम, ईएमएस/प्र.क्र.०९/का-१४
नवीन प्रशासन भवन,मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक,मुंबई -४०० ०३२.
दिनांक :- १३/१०/२०२५

प्रति,
जिल्हाधिकारी सर्व ( मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)
आयुक्त, महानगरपालिका (सर्व)

**विषय**:- राज्य निवडणूक आयोगाकडील इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांची नोंद ठेवण्याकरिता एका नोडल ऑफिसरची नेमणूक करुन, सदर कामकाज त्यांच्याकडे सोपविण्याबाबत.

**संदर्भ**:- **१.** राज्य निवडणूक आयोगाकडून दि.१०/०७/२०२५, दि.११/०७/२०२५ दि. १६/०९/२०२५ व दि. २५/०९/२०२५ रोजी व्हि. सी. द्वारे घेण्यात आलेल्या बैठका.
**२.** राज्य निवडणूक आयोगाचे दि. ०१/०९/२०२५ रोजीचे पत्र.
**३.** निवडणूक पूर्वतयारीच्या अनुषंगाने विभागीय स्तरावरील आढावाबैठक.
**४.** राज्य निवडणूक आयोगाकडील क्र. रानिआ/२०२५/ईव्हीएम/प्र.क्र.०७/का- १४, दि. ३०/०९/२०२५ रोजीचे पत्र
**५.** राज्य निवडणूक आयोगाकडील क्र. रानिआ/ ईव्हीएम/प्र.क्र.५/का-१४, दि. ०४/१०/२०२५ व दि. ०७/१०/२०२५ ची दोन स्वतंत्र पत्रे.
**६.** राज्य निवडणूक आयोगाकडील क्र. रानिआ/ ईव्हीएम/प्र.क्र.५/का-१४, दि. ०६/१०/२०२५ चे पत्र.
**७.** राज्य निवडणूक आयोगाकडील क्र.रानिआ/म.प्र.ईव्हीएम/प्र.क्र.५/का-१४, दि.०८/१०/२०२५ चे पत्र.

महोदय,

वरील संदर्भिय पत्रे तसेच राज्य निवडणूक आयोगाकडील व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे राज्यातील आगामी निवडणुकांच्या अनुषंगाने EVM ची माहिती प्राप्त करुन घेण्यात आली. EVM ( B.U. , C.U. , DMM) ची नोंद घेणे, EVM ची FLC करणे, आयोगाकडील वेळोवेळी होणाऱ्या आदेशानुसार EVM प्राप्त करुन घेणे अथवा इतरत्र पाठविणे व मतदान साहित्याबाबत समन्वय करणे तसेच सर्व EVM ची संगणक प्रणाली मध्ये नोंद करुन घेणे, याकरिता राज्य निवडणूक आयोगामार्फत EMS ( Electronic Voting Machine Management System ) विकसीत करण्यात आलेली आहे.

याकरिता उपजिल्हाधिकारी यांच्याकडे समन्वय अधिकारी म्हणून कामकाज सोपविणे व त्यांना आवश्यक असेल तेथे सहायक समन्वय अधिकारी नियुक्त करणे, याबाबत वेळोवेळी आयोगाकडून सूचना देण्यात आल्या आहेत. ( ठाणे जिल्हाधिकारी, कार्यालयाने याप्रकारे नोडल ऑफिसरची किंवा समन्वय अधिकाऱ्याची नियुक्ती केली आहे ).

महानगरपालिकेसाठी देखील EVM संदर्भात वर नमूदप्रमाणे कार्यवाही करण्याकरिता समन्वय अधिकारी नेमणे व सहायक समन्वय अधिकारी म्हणुन नियुक्ती करणे आवश्यक आहे. तरी, जिल्हाधिकारी व महानगरपालिका कार्यालयाने अधिकाऱ्याचे नियुक्ती आदेश काढून त्यांचे **नाव, पद, मोबाईल नंबर व ई-मेल आयडी** राज्य निवडणूक आयोगाला **sec-material@mah.gov.in** या ई-मेल वर तात्काळ आजच उपलब्ध करुन द्यावे, ही विनंती.

आपला,

(राजेंद्र पाटील)
उपायुक्त,
राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र